**श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर**

उपहारगृह भाडे तत्वावर देण्याचे जाहीर दरपत्रक.

समितीचे वेदांता व व्हिडीओकॉन भक्तनिवास येथील उपहारगृह भाडेतत्वावर देण्यासाठी दरपत्रके मागविण्यात येत आहेत. या संबंधीची माहिती, अटी व शर्ती तुकाराम भवन, पंढरपूर येथे आणि www.vitthalrukminimandir.org या वेबसाईटवर उपलब्ध आहे. दरपत्रके दि.१५/११/२०१७ रोजी सायं.५.०० वाजेपर्यंत पाठवावीत.

क्र.आस्थापना/कावि/ १३५४/२०१७ दि.३०/१०/२०१७

स्वा/–

कार्यकारी अधिकारी

**श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर**

**उपहारगृह भाडे तत्वावर देण्याबाबत.**

१. सदर कामाची माहिती, अटी व शर्ती आणि अर्जाचा नमुना कार्यालयीन वेळेत तुकाराम भवन येथे व www.vitthalrukminimandir.org या वेबसाईटवर मिळेल.

२. दरपत्रक इकडील नमुन्यात स्वतंत्र लिफाप्यात सिलबंद करून सादर करणे आवश्यक आहे. लिफाप्यावर ठेकेदाराचे नाव व पूर्ण पत्ता आणि दरपत्रक उपहारगृह भाडे तत्वावर घेणे कामासाठी भरलेले आहे, असा सविस्तर तपशिल नमुद करावा.

३. अर्जासोबत अनामत रक्कम रू.५,०००/– चा कार्यकारी अधिकारी, श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर यांच्या नावाचा डी.डी. सादर करणे आवश्यक आहे. फॉर्म व अनामत रकमेचा डि.डी. सिलबंद पाकिटात दि.१५/११/२०१७ रोजी सायं.५.०० वाजेपर्यंत सादर करणे आवश्यक राहील. सिलबंद अर्ज दि.१६/११/२०१७ रोजी दु.१२.०० वा. संत तुकाराम भवन येथे सर्व ठेकेदारांच्या समक्ष उघडण्यात येतील. ज्या ठेकेदारांना त्यावेळी इतर ठेकेदाराने नमुद केलेल्या दरांपेक्षा जास्त दराने बोली बोलावयाची असल्यास तशी संधी त्यावेळी देण्यात येईल. ज्या ठेकेदाराने जास्तीत जास्त दर नमुद केली असेल किंवा जास्तीतजास्त दर बोलला असेल त्याच्या नावे दरपत्रक मंजुर करण्यात येईल.

४. दरपत्रकासोबत आधारकार्ड, एफडीए परवाना, पॅनकार्ड, व्यवसाय परवाना, नोंदणी प्रमाणपत्र, अनुभव प्रमाणपत्रे इ. कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती सादर करणे आवश्यक आहे. अपूर्ण दरपत्रक स्विकारले जाणार नाही.

५. उपहारगृह भाडेतत्वाचा कालावधी ११ महिने राहील.

६. उपहारगृहाचे भाडे दर महिन्याचे १० तारखेपूर्वी आगाउ मंदिर समितीकडे जमा करणे आवश्यक आहे.

७. आवश्यकतेप्रमाणे मंदिर समितीकडून विद्युत व पाणी पुरवठा मोफत उपलब्ध करून देण्यात येईल.

८. उपहारगृहाची सेवा २४×७×१२ अशी उपलब्ध असणे आवश्यक आहे. मंदिर समितीच्या पूर्वपरवागनी शिवाय उपहारगृह बंद ठेवता येणार नाही.

९. उपहारगृह चालविणेसाठी आवश्यक असणारे सर्व परवाने नगरपालिकेकडून व शासनाचे संबंधित विभागाकडून घेणे आवश्यक आहे.

१०. उपहारगृहातील पदार्थांचा दर्जा उत्तम ठेवणे आवश्यक आहे. त्यासाठी चांगले गुणवत्तेचा कच्चा माल वापरणे आवश्यक आहे. त्याबाबत भक्तनिवासात येणाऱ्या भाविकांची कोणतीही तक्रार येणार नाही, याची दक्षता घेणे आवश्यक आहे.

११. उपहारगृहात फक्त शाकाहारी पदार्थ तयार करून ग्राहकांना देता येतील. मांसाहारी पदार्थ बनवता येणार नाहीत.

१२. उपहारगृहात तयार करून किंवा खरेदी करून विकण्यात येणारे पदार्थाचे दरपत्रक कार्यकारी अधिकारी यांची मान्यता घेवून उपहारगृहात लावणे आवश्यक आहे. ठरवून दिलेल्या दरापेक्षा जास्तीचे दर आकारता येणार नाही.

१३. उपहारगृह व परिसर सतत स्वच्छ ठेवणे आवश्यक आहे. त्याठिकाणी तयार होणारा कचरा नगरपालिकेने ठरवून दिलेल्या ठिकाणी टाकणे आवश्यक आहे.

१४. उपहारगृहातील भाड्यांची स्वच्छता उत्तम प्रकारे करणे आवश्यक आहे.

१५. उपहारगृहासाठी दिलेली इमारत व मंदिर समीतीने पुरविलेल्या साहित्यांची चांगली निगा राखणे आवश्यक आहे. त्याची मोडतोड झाल्यास त्याची दुरूस्ती करून किंवा बदलुन देणे आवश्यक राहील.

१६. उपहारगृहातील कामगारांनी स्वच्छ गणवेश परिधान करणे आवश्यक राहील. उपहारगृहात नियुक्त केलेल्या कामगारांची नावे, पत्ते व फोन नं. मंदिर समितीला देणे आवश्यक आहे.

१७. भक्तनिवासामध्ये निवास करणाऱ्या भाविकांना त्यांच्या खोलीमध्ये अल्पोहार किंवा जेवणाची सेवा दिल्यास त्यामुळे होणारा कचरा व भांडी तात्काळ खोलीतून नेणे आवश्यक राहील.

१८. उपहारगृहामध्ये मद्यपान करण्यास सक्त मनाई राहील.

१९. भक्तनिवासात राहण्यासाठी आलेल्या भाविकांव्यतिरीक्त बाहेरून फक्त उपहारगृहामध्ये सेवा घेण्यासाठी आलेल्या व्यक्तींच्या वाहनांचे पार्किंग मंदिर समितीने ठरवून दिलेल्या ठिकाणी करणे आवश्यक आहे. भक्तनिवासामध्ये राहण्यासाठी येणाऱ्या भाविकांकरीता कोणताही अडथळा होणार नाही याची दक्षता घेणे आवश्यक आहे.

२०. ठेकेदाराकडे अन्न व सुरक्षा व मानके कायदा २००६ व त्याबाबतचे नियम २०११ अंतर्गत परवाना असणे आवश्यक आहे.

२१. उपहारगृहाच्या ठिकाणी जे कामगार काम करणार आहेत. त्यांच्या प्रत्येक सहा महिन्याला वैद्यकीय तपासणी करून त्याचे प्रमाणपत्र या कार्यालयास दाखल करावे लागेल. तसेच कामगारांनी कॅप व हॅडग्लोज वापरणे आवश्यक आहे.

२२. अन्नातून विषबाधा अथवा अन्य काही शारिरीक त्रास झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी ठेकेधारकाची राहील.

२३. समिती वेळोवेळी जे निर्देश देईल अथवा अटीत जे बदल करेल ते पुरवठाधारकांस बंधनकारक राहतील.

२४. दरपत्रक ज्यांचे नांवे मंजूर होईल. त्यांनी रक्कम रू.१००/— चे स्टॅम्पपेपरवर सर्व अटी व शर्ती मान्य असलेबाबतचे प्रतिज्ञापत्र करून देणे आवश्यक आहे. तसेच तीन महिन्याच्या भाडयाइतकी रक्कम सुरक्षा रक्कम म्हणून जमा करणे आवश्यक आहे. सदरची सुरक्षा अनामत रक्कम कंत्राटदाराचे काम समाधानकारकरित्या पूर्ण झाल्यानंतर व करारनाम्याची मुदत संपल्यावर परत करण्यांत येईल.

२५. मंजुर ठेकेदार हा उपहारगृह समाधानकारकरित्या चालिवण्यास सक्षम नसल्याचे आढळून आल्यास, तसेच भाविकांनी त्यांचेकडील खाद्यपदार्थ खाल्यानंतर असमाधान व काही खराबी असल्याबाबत तक्रार नोंदवल्यास, कोणतेही कारण न देता ठेकेदाराशी केलेला करार रद्द करण्यांत येईल व त्याने भरलेली सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यांत येईल.

२६. प्रशासकीय व अन्य कारणास्तव दरपत्रक प्रक्रिया कोणत्याही स्तरावर रद्द करण्याचा अधिकार मंदिर समितीने राखुन ठेवलेला आहे.

२७. सदर कामासंबंधी काही वाद उद्भल्यास त्यासाठी न्यायालयीन कार्यक्षेत्र पंढरपूर हे राहील.

२८. वरील कोणत्याही एका अटी व शर्तीचा भंग झालेस पुरवठादारास जबाबदार धरणेंत येईल व मंजूर दरपत्रक कोणत्याही क्षणी रद्द केले जाईल.

———//———

श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर

**अर्ज**

प्रति,

मा. कार्यकारी अधिकारी,
श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती,
पंढरपूर, जि. सोलापूर.

विषय :– उपहारगृह भाडे तत्वावर घेणेबाबत.

ठेकेदाराचे पूर्ण नाव :– श्री.––––––––––––––––––––––––––––––––––

पूर्ण पत्ता :– ––––––––––––––––––––––––––––––––––

––––––––––––––––––––––––––––––––––

मोबाईल कं.:– ––––––––––––––––––––––––––––––––––

महोदय,

श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिर समिती, पंढरपूरचे वतीने वेदांता व व्हिडीओकॉन भक्तनिवास येथील उपहारगृह भाडे तत्वावर देण्याची दि.०१/११/२०१७ रोजीचे दैनिक सुराज्य, सोलापूर या वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द झालेल्या जाहीरातीप्रमाणे त्याचे दरपत्रक खालीलप्रमाणे सादर करीत आहेत.

| **तपशील** | किमान बोलीची भाडे रक्कम (रू.) प्रति महिना (लाईट बिल वगळून) | ठेकेदाराने नमुद केलेली जास्तीतजास्त भाडे रक्कम (रू.) प्रति महिना (लाईट बिल वगळून) |
|---|---|---|
| उपहारगृह | १५००० | |

सदर दराने मी दि.०१/१२/२०१७ ते दि.३१/१०/२०१८ या कालावधीत सदरचे उपहारगृह चालविण्यास घेण्यास तयार आहे. तसेच याबाबतच्या आपणाकडून देण्यात आलेल्या अटी व शर्ती मला मान्य असून त्यासंबंधीचे जरूर ते प्रतिज्ञापत्र स्टॅम्पपेपरवर करून देण्यास तयार आहे. रू.५,०००/– अनामत रकमेचा डी.डी./पावतीची झेरॉक्स प्रत सोबत जोडली आहे. त्यानुसार वरील नमुद दराप्रमाणे सदरचे उपहारगृह मला चालविण्यास मिळावे ही, नम्र विनंती आहे.

दिनांक /११/२०१७ ठेकेदाराची सही व शिक्का

सोबत खालील कागदपत्रे जोडलेली आहेत.

१. अनामत रक्कमेचा डी.डी/ रोखीच्या पावतीची झेरॉक्स प्रत.
२. अनुभवाची प्रमाणपत्रे.
३. स्वतःच्या ओळखपत्राची झेरॉक्स प्रत. (उदा. पॅनकार्ड, मतदान कार्ड व आधारकार्ड)
४. अन्न व सुरक्षा व मानके परवाना.
५. व्यवसाय परवाना.
६. नोंदणी प्रमाणपत्र.
७. पॅनकार्ड.
८. जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र.